रयत शिक्षण संस्थेचे ,सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग तसेच शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय उचत्तर शिक्षा अभियान (रुसा)अंतर्गत दिनांक ११ ओक्टोंबर २०२२ रोजी "**Recent Trends And Challenges In Physical Education And Sports** " या विषयावरती एक दिवासीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते .

या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे आंतरराष्ट्रीय कुस्ती खेळाडू हिंदकेसरी पैलवान रोहित पटेल,डॉ.शरद बनसोडे (संचालक,शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर)डॉ.बाबासाहेब उलपे (बी.ओ.एस चेअरमन शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर) प्रमुख मार्गदर्शक डॉ.सिंकू कुमार सिंग (शिक्षणशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड),अंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू,अर्जुन पुरस्कारप्राप्त मान.श्री शांताराम जाधव (पुणे),तसेच डॉ.ए.एम.मंजुनाथ (संचालक,टुमकुर विद्यापीठ,टुमकुर)तसेच महाविद्यालयातील शिछत्रपती पुरस्कारप्राप्त माजी खेळाडू या सर्वांचे कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने यांच्या शुभहस्ते बुके,शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार व स्वागत करण्यात आले .

उद्घाटन समारंभ प्रसंगी पैलवान रोहित पटेल यांनी चर्चासत्राला उपस्थित असणाऱ्या विविध महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांना खालचे महत्व व स्पर्धेच्या ठिकाणी आलेले अनुभव सांगितले व तसेच प्राध्यापक व विद्यार्थी यांच्याशी प्रश्न –उत्तरे असा संवाद साधला . यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने म्हणाले की, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्याचा उद्देश खेळातील नवीन नियमांचा व नवीन तंत्रज्ञानाचा वापर कश्या पद्धतीने करता येईल याचा विचार याठिकाणी मांडून चर्चा करण्यात यावी व भविष्यात अंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरती खेळणारे खेळाडू तयार करता यावे. उद्घाटन सत्राचे आभार डॉ .अभिजित मुळीक यांनी मानले.

**प्रथम सत्र :-**

या चर्चासत्राचे बिजाभाषक म्हणून डॉ.सिंकू कुमार सिंग (संचालक ,स्कूल ऑफ एज्युकेशन सायन्स,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड )यांनी उपस्थित सर्वाना डोपिंग या विषयावरती मार्गदर्शन केले.या सत्राचे अध्यक्ष डॉ .अनिल कांबळे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय,बार्शी) हे उपस्थित होते.या सत्राचे आभार डॉ दीपक पाटील-डांगे यांनी मानले.

**द्वितीय सत्र :-**

या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू,अर्जुन पुरस्कार विजेते मान.शांताराम जाधव यांचा परिचय डॉ.संजय पाटील यांनी करून दिला. मान .शांताराम

जाधव म्हणाले,खेळाचा विकास व खेळाडूंची प्रगती होण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.त्यांनी ते स्वत: आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळत असतानाचे अनुभव सांगितले.बाहेरील राज्यातील संघांचे सामन्यादरम्यान येणारे अनुभव सांगितले.व आपण अजून कशी प्रगती केली पाहिजे याचे मार्गदर्शन केले.

या सत्राचे अध्यक्ष्यास्थान प्रा.समीर पवार यांनी भूषविले .तर आभार प्रा. बाळासाहेब भोसले यांनी मानले .यानंतर रिसर्च पेपर वाचन घेण्यात आले.याला संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

**तृतीय सत्र :-**

या दुपारच्या सत्रामध्ये पोस्टर प्रेझेन्टेशन चे उद्धाटन तृतीय सत्राचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.ए.एम.मंजुनाथ (संचालक,टूमकुर विद्यापीठ,टूमकुर) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.या उपक्रमामध्ये एकूण ३५ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

तृतीय सातारचे म्रमुख मार्गदर्शक डॉ.ए.एम.मंजुनाथ यांचा परिचय डॉ.महेंद्र कदम पाटील यांनी करून दिला. तसेच त्यांचे बुके देऊन स्वागत डॉ.कोमल कुंडप यांनी केले.डो.मंजुनाथ यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा कश्या पद्धतीने प्रसारीत करता आले पाहिजे तसेच शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त , मानसिकदृष्ट्या सतर्क व सामाजिकदृष्ट्या सुस्थितत राहण्यासाठी शारीरिक शिक्षण हे एकूणच शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे.  तसेच एकविसाव्या शतकात शारीरिक शिक्षण हे आता फक्त खेळण्याच्या वेळेचे क्रिया ,क्रीडा प्रशिक्षण किंवा शारीरिक प्रशिक्षण राहिलेले नाही हे पटवून दिले.या सत्राचे आभार डॉ. सतीश माने यांनी मानले.

समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान श्री.आर.वाय.गायकवाड (रजिस्ट्रार,सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,कराड) हे होते .ते म्हणाले महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने प्रथमच राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय व सातारा विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते .पण चर्चासत्र हे पहिल्यांदाच आयोजित केले आहे आणि त्याला सहभागहि मोठ्या संख्येने आहे हे अभिमानास्पद आहे. खेळाचा विकास व्हावा, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर खेळाडूंनी करून आपला खेळ गतिमान करावा या उद्देशाने आज हे एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार या राष्ट्रीय चर्चासत्राच्या समन्वयक प्रा.विद्या पाटील (शारीरिक शिक्षण संचालक) यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.कोमल कुंदप व डॉ.सुनील जाधव यांनी केले.